गोदातीर दि 30/03/2023




# बकरे चोरणारी टोळी उस्माननगर पोलिसांच्या जाळ्यात

## पावणेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड-** रात्रीच्या वेळी शेतकऱ्यांच्या बकरे- शेळ्या पळवून नेणारी चोरांची टोळी उस्माननगर पोलिसांनी अटक केली. दोन चोरट्यांना अटक करून त्यांच्याकडून दोन बकरे, एक दुचाकी, एक ओमनी व्हॅन, चाकू आणि लॉक तोडण्याची टॉमी असा एकूण दोन लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग भारती यांनी दिली.

उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मंगळवार दि. २८ मार्चच्या पहाटे साडेतीनच्या सुमारास सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग भारती व त्यांचे सहकारी हवालदार मस्के, अंमलदार बालाजी राठोड, रेजितवाड आणि बलवान कांबळे हे गोळेगाव फाटा परिसरात गस्त घालत होते. यावेळी त्यांना अंधारात एक ओमनी व्हॅन, दुचाकी आणि या दोन्ही वाहनांच्या बाजूला राजू भरत सोळंके (वय १९) रा. कुरुळा ता. कंधार, अनिल गोविंद सोळंके (वय २२) रा. शेलगाव ता. लोहा आणि वामन माधव गरसोळे रा.पेठशिवनी ता. कंधार हे तिघेजण दबा धरून बसल्याचे दिसले. पोलीस आपल्याकडे येत असल्याचे लक्षात येताच वामन गर्सोळे हा अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला. परंतु पाठलाग करून राजू सोळंके आणि अनिल सोळंके या दोघांना पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून दोन बकरे, दुचाकी व व्हॅन, चाकू आणि लाक तोडण्याचे लोखंडी टॉमी असा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग भारती यांच्या फिर्यादीवरून उस्माननगर पोलीस ठाण्यात कलम १२२, १२४ मुंबई पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस अंमलदार बालाजी राठोड करत आहेत. पथकाचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार उपविभागीय पोलीस अधिकारी मारुती थोरात यांनी कौतुक केले.